INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.71 (SJIF 2021)

# चाफ्याचीवाडी [धारगाव] तालुका इगतपुरी जिल्हा नाशिक येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्यांचा अभ्यास

## (Study of Educational Problems of Students in Zilla Parishad School at Chafyachiwadi)

**श्रीम. मोनाली नंदकिशोर देशमुख**
**इंदिरानगर, नाशिक**

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/06.2021-93763234/IRJHIS2106037

**प्रास्ताविक :**

शिक्षण हे मानवी जीवनाचे आवश्यक अंग आहे. सावित्रीबाई फुले यांनी म्हटल्या प्रमाणे मनुष्यप्राण्यातील पशूपन जाऊन मानवत्व निर्माण करणारी प्रक्रिया म्हणून शिक्षण या प्रक्रियेकडे पाहिले जाते. शिक्षण संस्थेद्वारे जे शिक्षण मिळते त्याचा उपयोग व्यक्तींना समाजात चांगले जीवन जगण्यासाठी होतो. म्हणून शिक्षण वसमाज या दोन्ही बाबी एकमेकांशी निगडित आहेत. म्हणून शिक्षणाचा अर्थ जाणून घेणे आवश्यक आहे.

**शिक्षणाचा अर्थ-** शिक्षणाचा शाब्दिक अर्थ - शिक्षणाचा इंग्रजी शब्द एज्युकेशन हा लॅटिन भाषेतील शब्दापासून घेतलेला आहे. शब्दशः अर्थाने एज्युकेशन म्हणजे आतून बाहेरच्या बाजूने पुढे जाणे किंवा विकसित होणे म्हणजेच व्यक्तींच्या सुप्त गुणांचा विकास होईल. याचा अर्थ शिक्षित करणे असा होतो.

**संशोधनाची गरज :**

अशाप्रकारे शाळेत औपचारिक शिक्षण घेताना विद्यार्थ्यांना काही अडचणी भेडसावतात. त्यामुळे त्यांची शिक्षणातील गती कमी होते. ते अभ्यासात मागे पडतात. त्यांच्यामध्ये आत्मविश्वास कमी होतो. न्यूनगंड यासारख्या समस्यांशी त्यांना सामना करावा लागतो. इत्यादी कारणामुळे त्यांना शालेय प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी त्यांच्या शैक्षणिक समस्यांचा अभ्यास करून उपाययोजना सुचविणे आवश्यक आहे.

**समस्या विधान :**

चाफ्याचीवाडी [धारगाव] तालुका इगतपुरी जिल्हा नाशिक येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्यांचा अभ्यास.

**संशोधनातील कार्यात्मक व्याख्या :**

1. व्यक्तीला पूर्ण अभिव्यक्त करणे म्हणजे शिक्षण - स्वामी विवेकानंद
2. माणसाच्या शारीरिक, आध्यात्मिक पैलूंचे उत्कृष्टतेचा विकास व अभिव्यक्ती म्हणजे शिक्षण.

3. शिक्षण म्हणजे बालकाचे शरीर, मन व आत्मा या तिन्हींचा समतोल विकास होय - महात्मा गांधी
4. शिक्षण म्हणजे पूर्णत्वाचा विकास - विनोबा भावे
5. साक्षरता म्हणजे शिक्षण नव्हे, ज्ञान म्हणजे ही शिक्षण नव्हे तर प्रज्ञेचा ध्यास म्हणजे शिक्षण – डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन
6. विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली, नीतीविना गती गेली, गतीविना वित्त गेले, वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले - महात्मा फुले

**उद्दिष्टे :**

चाफ्याचीवाडी [घारगाव] तालुका इगतपुरी जिल्हा नाशिक येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्यांचा अभ्यास करणे तसेच वरील शिक्षण समस्यांवर उपाययोजना सुचवणे.

**गृहितके :**

1. शाळेतील बरेच विद्यार्थी शिक्षणासोबत इतर कामे करतात. या विद्यार्थ्यांना इतर कामे करत असल्यामुळे अभ्यासासाठी वेळ मिळत नाही.
2. आर्थिक दृष्ट्या मागास असणाऱ्या मुलांना अभ्यासासाठी पुरेशी शैक्षणिक साहित्य साधने पालकांकडून उपलब्ध होत नाहीत. त्यांना योग्य मार्गदर्शन आणि प्रेरणा मिळत नाही.
3. ग्रामीण भागातील पालक अर्थार्जनासाठी सतत कामात व्यस्त असतात. त्यामुळे मुलांकडे त्यांचे दुर्लक्ष होते.
4. सतत स्थलांतर करणारे पालक आपल्या मुलांना शाळेत प्रवेश घेण्यासाठी उत्सुक नसतात.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :**

हा संशोधन पेपर धारगाव या महसुली गावातील चाफ्याची वाडी या वाडीतील जिल्हा परिषद शाळेत पुरता मर्यादित आहे.

**माहिती संकलनासाठी वापरलेली साधने :**

प्रत्यक्ष मुलाखत, निरीक्षण, आणि नोंदी

**विश्लेषण :**

वर्तनातील अपेक्षित बदल म्हणजे शिक्षण.बालकाचे आठ वर्षापर्यंत वय मेंदू विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असते. अशा वेळी त्यांच्याकडे लक्ष देणे गरजेचे असते. परंतु नेमके यावेळी जर पालकांनी लक्ष दिले नाही तर विद्यार्थी विकासात ऋण परिणाम जाणवेल. तसेच बदलणाऱ्या शिक्षण पद्धतीत योग्य संस्कार, प्रबलन, स्पर्धात्मक कौतुक यांना महत्त्व असल्याकारणाने पालकांचा त्यात समावेश अपेक्षित आहे. त्यासाठी प्रथम त्यांच्या अडचणी सोडवणे गरजेचे आहे. पालकांनी जर योग्य वेळी आपल्या पाल्याच्या आवडीनिवडी लक्षात घेतले नाही तर मुलांमध्ये कमीपणाची, बुजरेपणा ची भावना उत्पन्न होऊ शकते.तसेच बालकाला उपजत लाभलेल्या बुद्धिमत्ता यांचा पट वेगळा असतो. त्यांचा शोध घेणे हे वयाच्या सातव्या-आठव्या वर्षापर्यंत शक्य असते. ज्याला या बुद्धिमत्ता तीव्रतेने प्राप्त झालेले असतात त्या क्षेत्रात काम करण्याचा त्याचा कल असतो. त्यात त्याला गती असते आणि रसही

असतो. याचप्रमाणे सर्वच मुले विकासाच्या विविध टप्प्यामधून अनुक्रमे जात असली तरीही त्यासाठी त्यांना विकास अनुरुप अनुभवांचा पुरवठा करावा लागतो. शिवाय वेगवेगळया टप्प्यांवर असताना त्यांना द्यावयाचे अनुभव वेगळे असावे लागतात. त्याचप्रमाणे शिक्षण विषयक आणखी एक तत्व म्हणजे भावनिक विकासाचे स्थान बालशिक्षणात महत्त्वाचे मानले पाहिजे. प्रेममय सौजन्याची वागणूक, सहकार्याची भावना, परस्परांच्या भावनांशी सहानुभूती, करुणा या गोष्टींच्या मनःपटलावर होणारा परिणाम दीर्घकालीन असतो. इत्यादीसारख्या तत्व बाबत पालकांमध्ये जागृती असणे अत्यंत गरजेचे आहे. परंतु ग्रामीण भागातील पालकांमध्ये वरील गोष्टींचा विचार याबाबत अभाव आढळतो. त्याचा वाईट परिणाम निश्चितच मुलांच्या सर्वांगीण विकासात दिसून येतो. हे टाळण्यासाठी मुलांच्या शिक्षणावर पालकांना कोणकोणत्या अडचणी येतात, त्याची त्याबाबत कोणती भूमिका आहे हे जाणून घेणे इष्ट ठरते. विकासाच्या अनुरूप अनुभवांचा पुरवठा करावा लागतो.

**सारांश :**

चाफ्याची वाडी (धारगाव) तालुका इगतपुरी जिल्हा नाशिक येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक समस्यांचा अभ्यास करताना असे दिसून आले की, पालकांची आपल्या पाल्या बाबत असलेल्या शैक्षणिक समस्येची व उदासीनतेची अनेक कारणे आहेत. ती पुढील प्रमाणे-

1. **अपुरा रोजगार-** धारगाव या महसुली गावाच्या पाच वाड्या असून त्यापैकी चाफ़्याचीवाडी ही एक आहे. तसेच या वाडीची लोकसंख्या एकशे वीस असून पालकांना आपल्या दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी अनेक वेळा निसर्गावरच अवलंबून रहावे लागते. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांचा अपुरा रोजगार होय. पालक आपल्या रोजीरोटीसाठी इतरांच्या शेतावर काम करतात, मजुरी करतात, पडेल ते काम करतात. अशा वेळी त्यांना आपल्या मुलांकडे लक्ष देण्यासाठी वेळ मिळत नाही. व आपल्या मुलांच्या शैक्षणिक गरजा ते पूर्ण करू शकत नाही.
2. **जुन्या रूढी व परंपरा यावर त्यांचा अत्यंत विश्वास -**जुन्या रूढी व परंपरा यावर त्यांचा अत्यंत विश्वास असून काही अनिष्ट रूढी यांचे ते पालन करतात. मुला मुलींचे शक्यतो ते लहान वयातच विवाह करून टाकतात. त्यामुळे मुलांचा शैक्षणिक विकास खुंटतो. मुले शाळेत जाण्यास नकार देतात. मुलांना शाळेत जाण्यासाठी पोषक वातावरण निर्मिती होत नाही. त्याचप्रमाणे एखादा पाल्य आजारी पडल्यास त्याला दवाखान्यात नेण्याऐवजी त्याचे पालक त्याला भगत इत्यादी ठिकाणी नेतात. व पारंपारिक उपचार करतात. त्यामुळे मुलांच्या आजारपणात वाढ होते.
3. **व्यसनी पालक-**चाफ्याची वाडी या वाडी मधील पालक मोठ्या प्रमाणावर व्यसन करतात. यामध्ये स्त्री व पुरुष दोन्ही व्यसन करतात. मिस्त्री लावणे, मद्यपान करणे इत्यादी त्यांचे व्यसन आहेत. या व्यसनामुळे त्यांचे आरोग्य बिघडते. त्यांच्यामध्ये मानसिक अनास्था दिसून येते. असे पालक आपल्या पाल्याची योग्य ती देखभाल करू शकत नाहीत. सहाजिकच त्यांच्याकडे दुर्लक्ष होते.
4. **बिघडलेले कौटुंबिक वातावरण -**बहुपती किंवा बहुपत्नीत्व, व्यसन, अल्प रोजगार, अपुरे शिक्षण, जाणीव जागृतीचा अभाव इत्यादी अनेक कारणांमुळे यांचे घरगुती कौटुंबिक संबंध व वातावरण बिघडलेले असते. त्याचा नकळत परिणाम पाल्यावर होतो. त्यामुळे त्यांच्या बाबतीत शैक्षणिक उदासीनता जाणवते.
5. **माहिती व तंत्रज्ञानाचा अभाव -**माहिती व तंत्रज्ञानाचा अभाव असल्यामुळे या जगामध्ये काय चालले आहे, नवीन नवीन कुठले शोध लागलेले आहेत. तंत्रज्ञान वापरून जीवनमान सोपे कसे झाले आहे, या बाबतीतले

ज्ञान त्यांना नसते. त्यामुळे मुलांचा आत्मविश्वास कमी होतो. त्यांना बाहेरील जगाशी तोंड देताना अनेक अडचणी भेडसावतात. अशावेळी पालकांमध्येच ज्ञानाचा अभाव असल्यामुळे ते आपल्या पाल्यांना मदत करू शकत नाहीत.

**निष्कर्ष :**

विद्यार्थ्यांच्या विकासात यांच्या शिक्षकांबरोबरच त्यांच्या पालकांचाही खूप मोठा वाटा असतो. पालकांच्या संस्कारांचा परिणाम विद्यार्थ्यांवर होत असतो. विद्यार्थ्यांची जडणघडण ही त्याच्या शाळेत, घरीही होत असते. पालकांच्या विचारांचा, राहणीमानाचा, बोलण्याचा, वागण्याचा परिणाम कळत नकळत विद्यार्थ्यांवर होत असतो. पाल्याच्या शिक्षणात आपली असणारी भूमिका ही बऱ्याच पालकांना ठाऊक नसते. तर काही पालक आर्थिकदृष्ट्या मागासलेले, परिस्थितीने गांजलेले, निरक्षर, अज्ञानी, भोळे, व्यसने इत्यादी असतात. व या सर्वांचा परिणाम पाल्यावर होतो. त्यांच्या शारीरिक, मानसिक विकासास पोषक असणाऱ्या गोष्टी पालक देऊ शकत नाहीत. त्यांना त्याबद्दल जाणीव नसते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात बाधा पोहोचते.

**संदर्भ साहित्य :**


1. उदयोन्मुख भारतीय समाज, संस्कृती आणि शिक्षण, सु. काळदाते, चिन्मय प्रकाशन, पुणे.
2. भारतातील समाज, काचोळे, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद.
3. समाजशास्त्रीय संशोधन पद्धती ,पु.ल.भांडारकर, म.ग्रं.नि.मंडळ नागपूर.
4. भारतातील आदिवासी समाज ,डॉ सुधाकर जाधव, चिन्मय प्रकाशन औरंगाबाद.
5. भारतीय समाज, डॉ सुधाकर जाधव ,प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.
6. समाजशास्त्रीय मूलभूत संकल्पना, डॉ सुधाकर जाधव, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.
7. भारतीय समाजातील शिक्षण, डॉ. के. बी. वीरकर, विद्या प्रकाशन नागपूर.
8. प्रात्यक्षिक सामाजिक संशोधन, डॉ. सुरेश मेश्राम, मातृसेवा प्रकाशन नागपूर.